**अल्पसंख्याक मुलींसाठी प्रत्येक जिल्ह्यात वसतीगृह- एकनाथराव खडसेरविवार, ०७ फेब्रुवारी, २०१६**

जळगाव : अल्पसंख्याक समाजात मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण तुलनेने खूप कमी आहे. त्यांच्या शिक्षणासाठी सुविधा उपलब्ध करुन देतांना प्रत्येक जिल्ह्यात अल्पसंख्याक मुलींसाठी वसतीगृह बांधण्यासंदर्भात शासनाच्या अल्पसंख़्याक विभागाने निर्णय घेतला आहे, अशी माहिती पालकमंत्री एकनाथराव खडसे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात अल्पसंख्याक मुलींसाठी वस्तीगृह बांधकामाच्या भुमिपूजन सोहळ्यानंतर श्री.खडसे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी खासदार ए. टी. नाना पाटील, अल्पसंख्याक विकास विभागाच्या प्रधान सचिव जयश्री मुखर्जी, सहसचिव अैनुल अत्तार, प्राचार्य डॉ. आर. पी. बोरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी शासनाने केलेल्या विविध उपाययोजनांची माहिती मंत्रीमहोदयांनी दिली. ते म्हणाले, अल्पसंख़्याक समाजाच्या शाळांच्या आधुनिकीकरणासाठी पुर्वी दोन लाख रुपये अनुदान दिले जात होते, ते आता पाच लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आले आहे. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी पालकांची उत्पन्न मर्यादा अडीच लाखांवरुन सहा लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे. प्रत्येक जिल्ह्यात एक वसतीगृह उभारण्यात येणार आहे. चोपड्याला अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना व्यवसाय शिक्षणासाठी आयटीआय तसेच जळगाव लोकसभा मतदार संघ कार्यक्षेत्रात आणखी एक आयटीआय मंजूर करण्यात येईल. अल्पसंख्याक वस्ती अधिक असलेल्या भुसावळ शहराचाही अल्पसंख्याक वस्ती सुधार योजनेत समावेश करण्यात येणार आहे. जळगाव शहरात याच योजनेतून 1 कोटी रुपयांची कामे हाती घेण्यात येत आहेत. अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षणासाठी आता तीन महिने कालावधीचे प्रशिक्षण कालावधीत विद्यार्थ्यांना 1500 रुपये दरमहा शिष्यवृत्ती व निवासी व्यवस्था शासनाने केली आहे, ही उपाययोजना पुढल्या वर्षापासून लागू होईल, असे त्यांनी सांगितले